## Certificate of Grant of Maharashtra Government


महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)

महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

Web : www.dirhe.org.in    E-Mail : info@dirhe.org.in

फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९    फॅक्स नं.०२०/२६१११११५३


क्र.एनजीसी/२०१०/४६१४५/अमती/मवि-२ ६७४५    दिनांक - 27 JAN 2010

संदर्भ-- १. शासन निर्णय क्रमांक-एनजीसी/२०९१/(३५६७)/विशी-२अ, दि. ८-८-९१.
२. शासन परिपत्रक क्रमांक- एनजीसी/१०९३/(५९१८)/मशि-३,दि.१९-६-९५.
३. शासन परिपत्रक क्रमांक-मुविसं/१९९६/(विसअ)/(५०१/९६) मशि-३, दि.५-६-९६.
४.सहसंचालक उच्च शिक्षण,अमरावती विभाग,अमरावती यांचे पत्र क्रमांक ससं/उशि/नवीन मवि/टक्केवारी/०९/३४५५,दिनांक-२१-११-२००९.

आदेश

उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग, निर्णय क्रमांक- एनजीसी/२०९३/(४७७७)/ युएनआय-२अ. दिनांक १८-१०-९३ अन्वये शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये व संदर्भाधिन सहसंचालक उच्च शिक्षण, अमरावती यांच्या पत्रान्वये केलेली शिफारस विचारात घेवून खालीलप्रमाणे महाविद्यालयाला सहाय्यक अनुदान मंजूर करण्यात येत आहे.

| संस्थेचे नाव | महाविद्यालयाचे नाव. | विद्याशाखा | शैक्षणिक वर्ष | अनुदान मंजूर केलेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| यवतमाळ जिल्हा विकास समिती बसस्टॅण्ड रोड,यवतमाळ | श्रीम.नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय,धामणगांव रोड,यवतमाळ | कला शाखा १ तुकडी | २००९-१० | १०० टक्के |

विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी अनुदान निर्धारण करून ते अदा करण्यापूर्वी खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे, याची खातरजमा करून घ्यावी.

या आदेशान्वये ज्या विद्याशाखांना अनुदान मंजूर करण्यात आले आहे, त्या विद्याशाखेमध्ये परिक्षेला प्रथम वर्षी प्रत्यक्ष बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या विद्यापिठाच्या निकालपत्रावरून तपासून घ्यावी व ती बरोबर असल्याची खात्री करून घ्यावी. नंतरच अनुदान निर्धारण करून अनुदान मंजूर करण्यात यावे.

१.या आदेशान्वये ज्या विद्याशाखांना अनुदान मंजूर करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्या प्रत्येक विद्याशाखेतील प्रथम, व्दितीय व तृतीय वर्षातील प्रत्येक विषयासाठी शासन निर्णय क्रमांक-एनजीसी/ १०९३ /(५९१८)मशि-३, दि. १९-जून, १९९५ व शासन निर्णय दि. १७ मार्च १९९९, अन्वये खालीलप्रमाणे विद्यार्थी उपलब्ध असणे आवश्यक आहे.

१.शहरी भाग — २४ विद्यार्थी

२.आदिवासी व दुर्गम विभागातील मुलामुलींची महाविद्यालये, ग्रामीण विभागातील महाविद्यालये आणि ५०,००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या शहरातील महिला महाविद्यालये व क वर्ग नगरपालिका क्षेत्रातील महाविद्यालये. — १० विद्यार्थी

विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,अमरावती यांनी अनुदान निर्धारणाच्या वेळी प्रत्येक विषयासाठी वरीलप्रमाणे विद्यार्थी उपलब्ध आहेत किंवा कसे, यांची खात्री करून घ्यावी व त्यानंतर त्या विषयासाठी नेमलेल्या शिक्षकांच्या वेतनावरील खर्चावर अनुदान मंजूर करून अदा करावे.

२ अनुदान निर्धारण करतांना फक्त शासनाने मान्यता दिलेल्या तुकड्याच विचारात घ्याव्यात.

३ जी विद्याशाखा अनुदानावर आणली आहे, त्या विद्याशाखेचा कार्यभार विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी तपासून नियमानुसार शिक्षक व शिक्षकेतरांची पदे मंजूर करावीत.

४. महाविद्यालयास / विद्याशाखेस अनुदान मंजूर केल्यामुळे जी पदे निर्माण होतील त्या पदावर संबंधित विषयांच्या अतिरिक्त शिक्षकांना शासनाच्या निर्णयाप्रमाणे सामावून घ्यावे.

५. अनुदान निर्धारण करतांना विद्यापीठाने व शासनाने त्या संबंधित महाविद्यालयांच्या विद्याशाखांना व तुकडयांना संलग्निकरण मंजूर केल्याची खात्री करून घ्यावी.

# Certificate of Grant of Maharashtra Government

- या महाविद्यालयास जी विद्याशाखा सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे, त्या विद्याशाखेच्या त्रिवर्षीय पदवी परीक्षेच्या पहिल्या वर्षाच्या वर्गात खाली दर्शविल्यांप्रमाणे विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला तरच वर्ग सन २०००-२००१ पासून सुरु करावा.

  अ) शहरी विभाग ५०
  ब) आदिवासी विभाग ४०
  क) ग्रामीण विभाग ५०
  ड) महिला महाविद्यालय ५०

- तसेच, सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षाच्या शेवटी होणा-या प्रथम वर्षाच्या विद्यापीठ परीक्षेत बसविण्या कमी खालीलप्रमाणे विद्यार्थी असणे आवश्यक आहे. :-

  अ) शहरी विभाग ५०
  ब) आदिवासी विभाग ३०
  क) ग्रामीण विभाग ४०
  ड) महिला महाविद्यालय ४०

२. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ च्या कलम ८३ मधील तरतुदीनुसार संलग्नीकरण देण्याबाबत योग्य ती कार्यवाही विद्यापीठाने तात्काळ करावी व पूर्तता अहवाल संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांना अग्रेषित करावा.

३. विद्यापीठाने शिफारस केलेल्या संस्थांपैकी ज्या संस्थांच्या प्रस्तावांना शासनाने मंजूरी प्रदान केलेली नाही, अशा संबंधित संस्थांना त्यांचा प्रस्ताव शासनाने नामंजूर केला असल्याचे विद्यापीठ स्तरावरुन परस्पर कळविण्यात यावे.

आपला विश्वासू,

(म. अ. सरपोतदार)
सहसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत -

शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
विभागीय सह संचालक (उच्च शिक्षण), अमरावती.
अध्यक्ष/सचिव, यवतमाळ जिल्हा विकास समिती, बस स्टॅण्ड रोड, यवतमाळ
खाजगी सचिव, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
खाजगी सचिव, मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
खाजगी सचिव, मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
खाजगी सचिव, राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
स्वीय सहाय्यक, प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती मशि-३.